# ''राजर्षी शाहू महाराज आणि सामाजिक न्याय''

**डॉ. ज्योती रमेश कांबळे,** राज्यशास्त्र विभाग, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड.

**प्रस्तावना**

सामाजिक न्यायाची संकल्पना ही मुख्यत: समाजातील सर्व व्यक्ती, धर्म, वंश, जात, रंग किंवा पंत हा फरक न करता समान आहेत या तत्वांवर मुख्यत: आधारित आहे. समाजात विशेषाधिकार असलेल्या वर्गाचा अभाव म्हणजे सामाजिक न्याय लोकांच्या तीन गरजांची पूर्तता करते हे जसे स्वातंत्र्य, समता, आणि बंधुत्व होय, सामाजिक न्याय ही संकल्पना आधुनिक काळात व्यापक अर्थाने वापरली जाते. लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये सामाजिक न्यायाला महत्वाचे स्थान आहे. लोकशाहीमध्ये व्यक्तींची समानता मुलभूत मानली जाते. म्हणूनच न्यायामागील मुलतत्वेही तीच असली पाहिजेत. सर्वांना एकच न्याय पध्दती आणि एकच कायदा असला पाहिजे असा संकेत आहे. भारतात सामाजिक न्यायाची संकल्पना प्रथम महात्मा फुले यांनी मांडली. मानवनिर्मित गुलामगिरीविरूध्द संघटीतपणे संघर्ष करून आपले नैसर्गिक अधिकार प्राप्त करून घेतले पाहिजेत. आणि स्वत:च्या धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक न्यायाच्या हक्कासाठी लढण्याची शिकवण बहुजन समाजाला महात्मा फुलेनी दिली. महात्मा फुले यांच्यानंतर राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी संघर्ष केला. समताधिष्ठीत समाजव्यवस्था अस्तित्वात नव्हती या असमानतेत सर्व दुर्बल घटकांचा बळी जात होता या असंख्य दुर्बल समाज घटकांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्टया समपातळीवर आणण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय हा जात, धर्म, वर्ग, स्त्रीया आणि भटके विमुक्त व अन्य घटकांच्यासाठी केलेल्या कार्यातून दिसून येतो.

**संशोधन पध्दती : विश्लेषणात्मक पध्दत**

**तथ्य संकलन : दुय्यम साधने**

**उद्‌दिष्टे :**

१. राजर्षी शाहू महाराज यांच्या आरक्षणाविषयक धोरण, शैक्षणिक विषयक धोरणातून व्यक्त होणारा सामाजिक न्याय अभ्यासणे.

२. राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्यता निवारण चळवळीतून व्यक्त होणारा सामाजिक न्याय अभ्यासणे.

३. राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री–विषयक धोरणातून व्यक्त होणारा सामाजिक न्याय अभ्यासणे.

**गृहितके:**

१. राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरक्षणाचे धोरण राबवून सामाजिक न्याय प्रस्थापित केला.

२. राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री–विषयक धोरण राबवून सामाजिक न्याय प्रस्थापित केला.

**राजर्षी शाहू महाराज यांचे आरक्षणविषयक धोरण व सामाजिक न्याय:**

राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या काळात गरिबांना न्याय मिळावा. त्यांना माणूस म्हणून जगता यावे. यासाठी आरक्षणाचे धोरण प्रभावीपणे राबविले तत्कालीन समाजव्यवस्थेत ब्राम्हण वर्ग हा संपूर्ण समाजातील वर्गावर वर्चस्व गाजवत होता. ब्राम्हण वर्ग ते आपली मक्तेदारी आपल्याकडेच कशी राहील यासाठी प्रयत्न केले होते. यासाठी समाजातील गरीब दुर्बल घटकाला शिक्षणापासूनच वंचित ठेवले भारतीय समाजामध्ये आरक्षण ही अतिशय महत्वपूर्ण बाब आहे. राजर्षी शाहू महाराज यांनी शंभर वर्षापूर्वी हा प्रयोग कायदे करून संस्थानात अंमलात आणला होता. यामधून विकसित झालेला समाज दिसून आला. हे आधुनिक भारतात सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत प्रेरणादायी ठरले. राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक पुर्नरर्चनेचा कार्यक्रम राबविताना तत्व व व्यवहाराचा योग्य समन्वय साधून सामाजिक न्याय राबविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी मागास घटकांसाठी आरक्षणाचे तत्व तर स्वीकारलेच परंतु प्रशासनातही मागास व्यक्तींना नेमणुका दिल्या ही बाब महत्वपूर्ण आहे. शिक्षणातील ब्राम्हण वर्चस्वामुळे इतर जाती शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास राहतात म्हणून शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच शिक्षणांतर्गत आरक्षण या बाबी बहुजन समाजाच्या दृष्टीने महत्वाच्या ठरतात. शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानामध्ये नोक–यांत ५०% जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या ही बाब सामाजिक न्यायाच्या दृष्टीने उचलेले महत्वपूर्ण पाऊल ठरले. स्वातंत्र्योत्तर भारतात आरक्षणाचे तत्व स्वीकारताना होणारा विरोध लक्षात घेता. १९०२ मध्ये प्रचंड विरोध असतानाही मागासवर्गीयांना नोक–यांमधील ५०% आरक्षणाचा घेतलेला निर्णय हा सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून महत्वाचा वाटतो. शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानामध्ये मोठया अधिकारांच्या जागी ब्राम्हणेतरांची नेमणूक केली इतकेच नव्हे, तर त्यांनी आपल्या दिमतीस गरीब वर्गातील लोक ठेवले समाजातील दुर्बल व शोषीत घटकांना शिक्षणाचा हक्क उपभोगता यावा यासाठी दि. २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानामध्ये आरक्षणाचा जाहीरनामा घोषित केला. या कायद्यामुळे संस्थानात ५०% राखीव

जागा ठेवल्या होत्या. राखीव जागा ठेवणारा हा पहिलाच कायदा होता. या कायद्यामुळे ब्राम्हणेत्तर जाती–जमातींना शासन–प्रशासन क्षेत्रात प्रथमच प्रतिनिधीत्व देऊन सामाजिक–न्यायाचा प्रयत्न केला.

**राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विकासाबाबतचा दृष्टिकोन व सामाजिक न्याय:–**

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराज यांनी महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवून आपल्या राज्यात व्यापक असे शैक्षणिक धोरण राबविले. राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणासंबंधी म्हटले आहे. ''शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झालेली नाही. अस्मानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्येवीर कधीही निपजणार नाहीत.'' राजर्षी शाहू महाराज यांची शिक्षणविषयक विशिष्ट ध्येयदृष्टी होती. त्यांच्यामते, शिक्षण हे केवळ शिक्षण नाही. केवळ शिक्षण नाही केवळ लिहिण्या–वाचण्यासाठी शिकायचे म्हणूनही शिकायचे नाही तर अवतीभोवतीच्या सर्वकष सामाजिक, धार्मिक, आर्थिक विषमतेच्या, अज्ञानाच्या दारिद्रयाच्या सर्वगामी युध्दातील शिक्षण हे प्रभावी हत्यार आहे. आणि यासाठीच शाहू महाराज यांनी सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे हे विचार त्यांनी मांडून आपल्या संस्थानात त्याची अंमलबजावणी केली. प्राथमिक शिक्षणाचा आदेश शाहू महाराज यांनी सन १९१२ मध्ये काढला यासाठी त्यांनी गावातील पाटलांना सांगून मुलांची यादी करायला सांगितली व घरा–घरात जाऊन शिक्षणाचे महत्व पटवून शाळेत नाव दाखल करण्यास भाग पाडले. शाळेत गैरहजर राहणा–या विद्यार्थ्यांना दंड स्वरूपात शिक्षा व संस्थानात साक्षरतेचे प्रमाण वाढावे म्हणून शिक्षण सुधार समिती स्थापन केली. शिक्षण समाजातील सर्व घटकापर्यंत पोहचावे यासाठी प्राथमिक शिक्षण देणे, उच्च शिक्षणाची सोय करणे, गरीब होतकरून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, त्यांना शिक्षणाची मोफत सोय करून देणे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात राहता यावे म्हणून वसतिगृह उपलब्ध करून देणे, शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना नोक–या उपलब्ध करून देणे, यावरून शाहू महाराजांचा शैक्षणिक दृष्टिकोन किती व्यापक होता हे लक्षात येते. शाहू महाराज यांनी गाव तेथे शाळा हे धोरण स्वातंत्र्योपूर्व भारतात कोल्हापूर संस्थानात १०० वर्षापूर्वी गाव तेथे शाळा हे धोरण स्विकारून शाळेत प्रशिक्षित शिक्षकांच्या नेमणूक करणे, हे निर्णय शेवटच्या माणसापर्यंत शिक्षण नेवून पोचविणे या ध्येयाच्या दृष्टीने आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टिने महत्वाचे आहे. सामाजिक न्यायापासून वंचित असलेल्या स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देवून मुलींना शिक्षण कालावधीत विद्यावेतन देणा–या शाहू महाराज यांचा मूळ उद्देश शिक्षणातून स्त्री–उध्दार हाच होता. कोल्हापूर संस्थानात एकूण उत्पन्नाच्या २३% इतका खर्च शाहू महाराज यांनी करणे ही बाब वंचित घटकांना सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण स्वरूपाची आहे. मुलांच्या शिक्षणासाठी वसतिगृहांची निर्मिती राजर्षी शाहू महाराज यांनी केली. वसतिगृहांची उभारणी करताना जातवार वसतिगृह उभारले ही बाब प्रथम दर्शनी योग्य वाटत नसली तरी जातिधिष्ठीत समाजात शिक्षणाच्या माध्यमातून जातीभेदाचे कटू बीज नष्ट करून तद्नंतर सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी एकच वसतिगृह ही योजना मनात होती. म्हणूनच पुढे मराठा वसतिगृहात मुस्लिम आणि अस्पृश्य मुलांना प्रवेश दिला गेला.

राजर्षी शाहू महाराज यांनी मुलांबरोबरच मुलींनाही शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. संस्थानात मुलींसाठी खास स्वतंत्र शाळा स्थापन केल्या होत्या. शाहू महाराज यांच्या कारकिर्दीच्या पहिल्या ४ ते ५ वर्षात भुदरगडसारख्या सहयाद्रीलगतच्या मागासलेल्या भागात मुलींच्या शाळा स्थापन झाल्या होत्या. कोल्हापूरमध्ये वेगवेगळया जातींसाठी २० स्वतंत्ररित्या वसतिगृहे निर्माण केली गेली होती. शाहू महाराज यांनी व्यावसायिक प्रशिक्षण सुरू करून गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊ केली होती. राजर्षी शाहू महाराज यांनी सुरू केलेल्या विधायक स्वरूपाच्या शैक्षणिक कार्याच्या वाढत्या प्रभावांची परिणती कोल्हापूर जिल्हयामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेत झाली. १९१२ मध्ये शाहू महाराज यांनी सर्व प्राथमिक शिक्षणाचा आदेश काढला प्रत्येक गावातून मुलांची यादी करून शिक्षणाचे महत्व त्यांना पटवून देवून शाळेत आणणे. गैरहजर विद्यार्थ्यांना दंड लावण्यासाठी शिक्षण सुधार समिती स्थापन केली मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती व वसतिगृहाची उपलब्धी या सर्व बाबींमुळे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे धोरण सफल झाले ही बाब सामाजिक न्यायाच्या दृष्टिने महत्वपूर्ण आहे.

**राजर्षी शाहूं महाराज यांचे स्त्री–विषयक धोरण आणि सामाजिक न्याय:–**

भारतीय समाज वर्णावर, जातींवर उभा आहे. पुरूषप्रधान संस्कृतीचा तो समर्थक आहे. ही व्यवस्थाच मुळात विषमता गोष्टींमध्ये समाजातील स्त्रीयांना हीन व शुद्रांपेक्षाही हीन वागणूक संस्थानात स्त्री सुधारणेचा पाया घातला. स्त्री उध्दारासाठी कायदे करून त्यांची अंमलबजावणी आपल्या संस्थानात केलेली दिसून येते. यामध्ये, राजाराम कॉलेज कोल्हापूर येथे मुलींना फी माफ केली. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले. परंतु यापेक्षाही स्त्रीया आणि विवाह यासंबंधी केलेले कायदे सामाजिक न्याय प्रस्थापित करतांना दिसतात. शाहू महाराज यांनी जोगत्या मुदली प्रतिबंधक कायदा करून धर्माच्या नावाखाली देवादिकांना मुले–मुली वाहण्याची घृणास्पद पध्दतीवर कायदा करून प्रतिबंध आणले. याबरोबरच संस्थानात १२ जुलै १९१९ ला कोल्हापूर संस्थानात विवाहसंबंधीचा कायदा केला. यामध्ये १८ वर्षाचे वय पार केलेल्या मुलीला स्वत:च्या निर्णयानुसार लग्न करण्याची तरतूद होती. तसेच लग्नासाठी मुलीचे वय १४ आणि

मुलाचे वय १८ असा वटहुकूम काढला व कोतवालाकडून दाखला मिळाला पाहिजे. असा कायदाच केला. विधवा पुर्नविवाहाला १९२७ साली मान्यता देणारा कायदा केला. तसेच संस्थानातील अनेक समाज विभागांत घटस्फोटांसंबंधी जात पंचायतीचे कायदे होते. आणि त्याप्रमाणे त्यांचा व्यवहार चालत असत. शाहू महाराज यांनी जातिप्रथेप्रमाणे काडीमोड घेण्यासंबंधी कायदा केला. ११ जुलै १९१९ ला काडीमोड कायदा केला. हा कायदा ख्रीश्चन, पारशी समाज सोडून अन्य सर्व जाती–जमातींना हा कायदा लागू केला. समाजातील देवदासी प्रथेला त्यांचा कडाडून विरोध होता. देवाधर्माच्या नावाखाली महिलांची विटंबना व्हावही हे शाहू महाराजांना मान्य नव्हते. देवदासीपासून जन्माला आलेल्या अनौरस संततीना मालमत्तेचा वाटा देण्याचा कायदा केला. देवीला सोडल्यानंतरही जनक घराण्यातील म्हणजेच वडिलांच्या मालमत्तेवरील तिचा हक्क अबाधित असतो. तो हक्क शाहू महाराज यांनी रद्द केला होता. यामागे त्यांचा हा उद्देश होता की जगण्याचे साधन अबाधित राहते म्हणून एखादी स्त्री देवदासी होऊ नये ही यामागची भूमिका होती. या प्रथेविरोधात शाहू महाराज यांनी ५ जुलै, १९९९ ला एक हुकूम काढला त्यामध्ये आपल्या संस्थानामधील बलुतेदारी रद्द झाल्याचे जाहीर केले. पूर्वी शिमग्याच्या (होळी) सणादिवशी महिलांना अश्लील, बिभत्स, अर्वाच्च शिव्या देण्याची प्रथा होती. या अनिष्ट प्रथा विरोधात मार्च, १९२१ रोजी जाहीरनामा प्रसिध्द करून हुकूमाविरूध्द वर्तन केल्यास कठोर शिक्षेची तरतूद केली. स्त्री शिक्षणाचा पुढाकार घेतला. शिक्षणामध्ये स्त्री–पुरूष असा भेदभाव न करता मुलींना शिक्षणाची समान संधी दिली. मुलींच्या स्वतंत्र शाळा उभ्या केल्या. १९९४ मध्ये २२४ शाळा होत्या त्या १९२२ मध्ये ५५९ झाल्या. मुलींच्या शाळा २५ वरून ३३ वर गेल्या मुली शिक्षित व्हाव्या म्हणून राजाराम कॉलेजात मुलींना शैक्षणिक फी माफ केली. समिती स्थापन करून मुलींची संख्या वाढेल शाळांमध्ये याची खबरदार घेतली. स्त्रीयांची होणा–या छळवणूकी विरोधात १ ऑगस्ट १९१९ मध्ये स्त्रियांच्या छळवणूकीस प्रतिबंध करणारा कायदा केला. या कायद्यानुसार संस्थानात स्त्रीयांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात केली. हे स्त्रीयांच्या त्यांच्या हक्कांचे संरक्षण करून सामाजिक न्याय प्रस्थापित केल्याचे दिसून येते.

**शाहू महाराज यांच्या सामाजिक न्यायाच्या धोरणांची समकालीन प्रस्तुतता:–**

मागासवर्गीयांच्या विकासासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी स्वीकारलेले सामाजिक न्यायाचे तत्व त्यातूनच त्यांनी आकारलेले शैक्षणिक दृष्टिकोन, आरक्षणाचे धोरण, मागासवर्गीयांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सक्षमीकरणाच्या दृष्टिने महत्वपूर्ण असे आहे. राज्यघटनेत आरक्षणाचे तत्व स्वीकारलेले असले तरी राजर्षी शाहू महाराज यांनी आरक्षणाच्या दृष्टीने उचललेली पावले व त्याची प्रत्यक्ष केलेली अंमलबजावणी ही बाब सामाजिक न्यायाच्या दृष्टिने महत्वपूर्ण आहे. शिक्षणांतर्गत शिक्षणापासून वंचित घटक स्त्रियांचे विद्यावेतन आणि शिष्यवृत्तींच्या माध्यमातून दिलेले प्रोत्साहन व त्यांच्या आणलेला शैक्षणिक उत्कर्ष ही बाब आजच्या कालखंडात महत्वपूर्ण आहे. राजर्षी शाहू महाराज यांनी महात्मा फुले यांच्यानंतर त्यांच्या सिध्दांतानुसार समाजामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित केला.

**निष्कर्ष:**

राजर्षी शाहू महाराज यांना अभिप्रेत असलेला सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याची गरज सध्या दिसून येते. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये आरक्षण ही बाब अतिशय महत्वाची आहे. म्हणूनच शासकीय क्षेत्रापासून ते खाजगी क्षेत्रापर्यंत आरक्षणाचे धोरण तत्वत: लागू केले पाहिजे. शिक्षण क्षेत्रातील बाजारीकरण थांबवून गरिब मुलांच्यातील शिक्षणातील गळतीचे प्रमाण थांबविणे आवश्यक आहे. राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा आदर्श घेऊन देशातील मंदिराचे आर्थिक उत्पन्न शिक्षणासारख्या महत्वाच्या क्षेत्राच्या उत्पन्नासाठी खर्च केले गेले पाहिजे. यामधून राजर्षी शाहू महाराज यांना अभिप्रेत असलेला सामाजिक न्याय आज प्रस्थापित करता येईल.

**संदर्भ सूची**

१) गाबा ओमप्रकाश, ''राजनितिक विचार विश्वकोष'' नॅशनल पब्लिशिंग, नई दिल्ली, पृ.क्रं. १६१.

२) डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ– महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर पृ.क्रं. १००३, १०२७

३) कॉ. पानसरे गोविंद, ''राजर्षी शाहू वसा आणि वारसा'', भारती मुद्रणालय, कोल्हापूर पृ.क्रं. १६,१७

४) कीर धनंजय, ''राजर्षी शाहू छत्रपती'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पृ.क्रं. ४३.

५) डॉ. संगवे विलास, ''राजर्षी शाहू महाराजांचे अभूतपूर्व शिक्षण कार्य: व्याप्ती व फलश्रुती,'' महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, १०८, कोल्हापूर पृ.क्रं. ५९२.